# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ई, के.एम. मुन्शी मार्ग, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे – ४११ ०१६

☎(020)25656234, FAX : (020)25656234

ईमेल : ropune.dte@gmail.com संकेतस्थळ : ww.ropune.org.in

जा.क्र. तंशिविकापु/संवि/2017/ 825 दिनांक : 02 MAR 2017

प्रति,

संचालक / प्राचार्य,

सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या तंत्रशिक्षण संस्था,

पुणे विभाग

विषय :- राज्य शासनाच्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सन २०१६-१७ च्या अर्जामधील आधारकार्ड / बँक तपशिलाबाबत

संदर्भ :- तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक 18/तंशिसं/संस्था पत्र/२०१७/२८ दिनांक २७/०२/२०१७

राज्य शासनाच्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सन २०१६-१७ च्या अर्जामध्ये बँक खाते व आधारकार्ड बाबतची माहिती भरण्यात आलेली आहे. तसेच संस्थेनी सदर माहितीची तपासणी करुन अर्ज मंजुरीची कार्यवाही केलेली आहे.

तथापि, विद्यार्थ्यांच्या आधारकार्ड / बँक तपशिलामध्ये (आधारकार्डावरची माहिती नाव / जेंडर / जन्मतारीख इ. व अर्जामधील माहिती यामध्ये तसेच बँक खात्याच्या माहितीमध्ये बँकेचे नाव/खातेदाराचे नाव/IFSC Code इ.) तफावत आढळुन आली आहे.

ज्या विद्यार्थ्यांच्या माहितीमध्ये तफावत आहे अशा सर्व विद्यार्थ्यांची यादी संस्थेच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करुन देण्यात आली आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांच्या माहितीमध्ये दिनांक १० मार्च २०१७ पर्यंत दुरुस्ती करण्याबाबत तंत्रशिक्षण संचालनालयाकडुन उपरोक्त संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झाले आहे. तसेच याबाबतचा रिपोर्ट दिनांक १५ मार्च २०१७ पर्यंत अपलोड करावयाचा आहे.

तंत्रशिक्षण संचालनालयाकडुन प्राप्त झालेले पत्र सोबत जोडले आहे. सदर पत्राचे अवलोकन करुन त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे माहिती दुरुस्तीची कार्यवाही विहित मुदतीत पुर्ण करावी. सदर मुदतीनंतर आधारकार्ड / बँक तपशीलामध्ये तफावत आढळल्यास या शिष्यवृत्ती संदर्भातील कोणत्याही तक्रारीची दखल **घेतली जाणार नाही याची गांभिर्याने नोंद घ्यावी.**

Gaikwad 2/3/17

सहसंचालककरिता

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

सोबत : तंत्रशिक्षण संचालनालयाकडुन प्राप्त पत्राची प्रत.

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी २२६१७९६९ फॅक्स – २२६९०००७

E-mail : desk18@ dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


**Web Notification**

का.क्र. :१८/तंशिसं/संस्था-पत्र/२०१७/२८

दिनांक :- २७/०२/२०१७

प्रति,
सर्व संबंधित विद्यार्थी / प्राचार्य,

विषय :- **राज्य शासनाची अल्पसंख्याक विद्यार्थ्यासाठी शिष्यवृती योजना सन २०१६-१७ च्या अर्जामध्ये भरलेल्या आधारकार्डबाबत...**

राज्य शासनाच्या अल्पसंख्याक शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांकडून ऑनलालाईन अर्जामध्ये बँकखाते (Bank Name, IFSC Code, A/c No.) व आधारकार्ड नंबर, पासबुक व आधारकार्डची स्कॅन कॉपीसह अपलोड करुन भरण्यात आले. तसेच संस्थेने आपला लॉगिन आयडी व पासवर्ड वापरुन त्या संस्थेमधून विद्यार्थ्यांची अर्जामध्ये भरलेल्या सर्व माहितीची (नाव, बँक खाते, आधारकार्ड नंबर इ.) तपासणी करुन अर्ज मंजूर / नामंजूर करण्यात आले.

**संस्थांकडून तपासणी करुन देण्यात आलेल्या काही विद्यार्थ्यांचे बँक खाते व आधारकार्ड तपशिलामध्ये तफावत** (आधारकार्डवर प्रिंट असलेले नांव व ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेल्या नांवात फरक / जन्मतारिख / जेंडर) **आढळून आली.**

ज्या विद्यार्थ्यांच्या आधारकार्ड तपशिलामध्ये तफावत आढळून आली आहे अशा सर्व विद्यार्थ्यांची संस्थानिहाय यादी संबंधित संस्थांना त्यांच्या लॉगिन आयडी च्या Institute Panel मध्ये "Updation of Aadhaar details" अंतर्गत देण्यात आलेली आहे. संस्थांनी असे सर्व विद्यार्थ्यांचे आधारकार्ड नंबर पुनर्तपासणी करुन व आधारकार्डची स्कॅन कॉपी अपलोड करुन दि.१० मार्च, २०१७ पर्यंत Confirm/Update करावे व सिस्टीमद्वारे प्राप्त होणारी ऑनलाईन Report ची स्कॅन कॉपी (प्राचार्यांच्या नांव, सही व शिक्क्यासह) **दि. १५ मार्च,२०१७** पर्यंत ऑनलाईन अपलोड करावी, जर पुनर्तपासणी करुन दिलेल्या आधारकार्ड तपशिलामध्ये परत तफावत आढळून आली **तर या शिष्यवृत्ती संबंधातील कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.**

**टिप:** विद्यार्थ्याने आपला आधारकार्ड नंबर त्यांच्या इतर खात्याशी संलग्न न करता विद्यार्थ्याने अर्जामध्ये भरलेल्या बँक खात्याशी संलग्न करावा व याबाबत संस्थांनी सर्व विद्यार्थ्यांना सूचित करावे. संस्था / विद्यार्थ्यांनी सांकेतिक स्थळ: www.dtemaharashtra.gov.in/scholarships वर देण्यात आलेले "Check Your Aadhaar No. (UID No.) is linked with Bank A/C or Not" द्वारे किंवा *99*99# हा क्रमांक मोबाईल फोनद्वारे डायल करुन आधारकार्ड बँक खात्याशी संलग्न / लिंक्ड आहे किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी. जर आधारकार्ड बँक खात्याशी संलग्न / लिंक्ड नसेल तर विद्यार्थ्यांनी बँकेत जाऊन आधारकार्ड बँक खात्याशी संलग्न/ लिंक्ड करुन घ्यावे व वरील देण्यात आलेल्या सुविधेद्वारे खात्री करुन घ्यावी.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.,मुंबई.

प्रत : सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, अमरावती यांना माहितीसाठी.